सत्यमेव जयते

**महसुल व वन विभाग**

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी,**

**पाचोरा भाग, पाचोरा यांचे कार्यालय**

दुरध्वनी क्र-02596-240296 ई-मेल आयडी-sdmpachora@gmail.com

क्रमांक/दंडप्र-2/गौख/कावि/46/2020. दिनांक :-14/10/2020.

विषय :- फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 लागु करणेबाबत.

आदेश :-

ज्याअर्थी, पाचोरा / भडगांव तालुक्यातील गिरणा, तितूर व गडद या तीन नदीच्या पात्रातून अवैध वाळू उपसा होत असल्याच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त होत आहेत. महसूल विभागाचे पथकामार्फत अवैध गौणखनिज वाहतकीबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. परंतू सध्या या तीनही नदीपात्रात अधिकृत लिलाव देण्यात आलेले नसून अवैध वाहतुकीवर परिणामकारक कार्यवाही करण्याच्या दृष्टीने पाचोरा तालुक्यातील बांबरुड खु., पुनगांव, मांडकी, ओझर, अंतुर्ली बु. प्र.पा. भातखंडे खु. परधारडे, बहूळेश्वर, दुसखेडे, कुरंगी, माहिजी, वरसाडे प्र. बो., बाळद बु., नाचणखेडे, होळ, सांगवी बु. प्र.भ. घुसर्डी बु. प्र. भ., वडगांव खु. प्र.भ व प्रिंपी बु. प्र.भ. तसेच भडगांव तालुक्यातील भडगांव, सावदे, टोणगांव, बांबरुड प्र.उ., गिरड, कराब, वडदे, वाडे, पिंपळगांव बु., भटट्गांव, अंतुर्ली बु,, भातखंडे बु., नावरे, बाळद खु. गिरड व कोठली या गावातील गिरणा, तितूर व गडद या तीन नदीच्या पात्रातून वाहनाने वाळू चोरी जाऊ नये, तसेच वाळू चोरीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी वरील गावातील गिरणा, तितूर व गडद या तीन नदीच्या पात्रात वाळु वाहतुक / उत्खनन करणाऱ्या (बैलगाडीसह) वाहनांना प्रवेश करण्यास प्रतिबंध करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी उपविभागीय दंडाधिकारी, पाचोरा भाग पाचोरा फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 आणि अन्य सर्व प्राप्त अधिकारानुसार दिनांक 15/10/2020 रोजी सकाळी 00:00 वाजलेपासून दिनांक 14/12/2020 रोजी सांयकाळी 24:00 वाजेपर्यंत पाचोरा तालुक्यातील बांबरुड खु., पुनगांव, मांडकी, ओझर, अंतुर्ली बु. प्र.पा. भातखंडे खु. परधारडे, बहूळेश्वर, दुसखेडे, कुरंगी, माहिजी, वरसाडे प्र.बो., बाळद बु., नाचणखेडे, होळ, सांगवी बु. प्र.भ. घुसर्डी बु. प्र. भ. वडगांव खु. प्र.भ. व प्रिंपी बु. प्र.भ. तसेच भडगांव तालुक्यातील भडगांव, सावदे, टोणगांव बांबरुड प्र.उ. गिरड, कराब, वडदे, टेकवाडे, वाडे, पिंपळगांव बु., भटट्गांव, अंतुर्ली बु,, भातखंडे बु., नावरे, बाळद खु. गिरड व कोठली या गावातील गिरणा, तितूर व गडद नदीच्या पात्रातून वाहनाने वाळू चोरी जाऊ नये, तसेच वाळू चोरीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी वरील गावातील गिरणा, तितूर व गडद या तीन नदीच्या पात्रात वाळु वाहतुक / उत्खनन करणाऱ्या (बैलगाडीसह) वाहनांना प्रवेश करण्यास प्रतिबंध करीत आहे.

कोणत्याही व्यक्तीने वरील आदेशाचे उल्लंघन केल्यास त्यांचेविरुध्द भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188 अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

Scanned by CamScanner

सदरचा आदेश शासकीय कर्तव्यावरील महसूल अधिकारी, कर्मचारी, पोलीस अधिकारी, कर्मचारी किंवा शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे वाहन तसेच सदर क्षेत्रात वाहनास प्रवेश करण्यासाठी सक्षम अधिकाऱ्याने परवानगी दिलेल्या वाहनास लागू होणार नाही.

सदर आदेश माझे सही व शिक्यानिशी आज दिनांक 14/10/2020 रोजी पाचोरा येथे जारी करण्यात आला.

स्वाक्षरीत/-
**(राजेंद्र कचरे )**
**उपविभागीय दंडाधिकारी**
**पाचोरा भाग, पाचोरा.**

प्रतिलीपी.

1) मा. जिल्हादंडाधिकारी जळगांव (खनिकर्म शाखा) यांना माहितीसाठी सविनय सादर.
2) मा. पोलीस अधिक्षक, जळगांव यांना माहितीस्तव सविनय सादर.
3) मा. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, जळगांव यांना माहितीसाठी व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
4) जिल्हा माहिती अधिकारी, जळगांव यांना देवून कळविण्यात येते की, सदरआदेशास आवश्यक प्रसिध्दी देण्यात यावी.
5) मा. व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे सदर आदेशास राजपत्रात प्रसिध्द करणेस विनंती आहे.
6) उपविभागीय पोलीस अधिकारी, पाचोरा यांना माहितीस्वत.
7) उपविभागीय पोलीस अधिकारी, चाळीसगांव यांना माहितीस्तव.
8) तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पाचोरा यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.
9) तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी भडगांव यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.
10) गट विकास अधिकारी पाचोरा / भडगांव यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
11) पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन पाचोरा / भडगांव यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.
12) सहा. पोलीस निरीक्षक, पिंपळगाव बु. ता. पाचोरा. यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.

SUB-DIVISIONAL MAGISTRATE उपविभागीय दंडाधिकारी पाचोरा भाग, पाचोरा PACHORA DIV. DIST. JALGAON

**( राजेंद्र कचरे )**
**उपविभागीय दंडाधिकारी**
**पाचोरा भाग, पाचोरा.**

Scanned by CamScanner